वाचले – १) शासन निर्णय क्रमांक एसएफएस-१०१७/प्र.क्र. ६६८/एस.एस-२ दिनांक २७ ऑक्टोबर २०१७

२) क्र. मप्राशिप/सशि/लेखा/शाळास्तर खाते/२०२३-२०२४/२१९६ दिनांक २७ जुलै २०२३

३) दिनांक ०९/०७/२०२४ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र. माध्य/शि/०७/ काबि/२३ / २०२४
दि. ०९/०७/२०२४

विषय – मराठी माध्यमिक विदयालयातील मुख्याध्यापक यांना तात्पुरता अतिरीक्त कामकाजाचा पदभार देणेबाबत.....

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपलिका माध्यमिक शिक्षण विभागातंर्गत १) उर्दू माध्यमिक विदयालय रुपीनगर, २) उर्दू माध्यमिक विदयालय थेरगाव, ३) उर्दू माध्यमिक विदयालय खराळवाडी, ४) उर्दू माध्यमिक विदयालय लांडेवाडी, ५) उर्दू माध्यमिक विदयालय नेहरुनगर, ६) उर्दू माध्यमिक विदयालय दापोडी ( फुगेवाडी) या ठिकाणी सन २०१५-१६ पासुन नवीन ०६ उर्दू माध्यमिक विदयालय स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर सुरु करणेत आलेली आहेत. या उर्दू माध्यमिक विदयालयांना वाचले क्र. ०१ अन्वये इयता ९ वी व इयता १० वी उर्दू माध्यमिक विदयालय सरु करणेस शासनाची मान्यता मिळालेली आहे. तसेच संबधीत ०६ विदयालयांना युडायस क्रमांक व एस.एस.सी बोर्ड सांकेतीक क्रमाक प्राप्त झालेले आहेत.

०६ उर्दू माध्यमिक विदयालयांना शासनाची प्रथम मान्यता मिळणेकामी कार्यवाही सुरु आहे. तथापी वाचले क्र. ०२ अन्वये उपरोक्त विदयालयांना युडायस नंबर मिळालेले असलेने महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई समग्र शिक्षा अंतर्गत विदयालयांना अनुदान मिळते. सदरचे अनुदान विदयालयांना मिळणेकामी विदयालयात मुख्याध्यापक यांची नेमणूक करणे आवश्यक आहे.

०६ उर्दू विदयालयांना मा.उपसंचालक कार्यालयाकडून प्रथम मान्यता तसेच जिल्हा परीषद पुणे यांच्याकडून संच मान्यता मिळेपर्यंत सद्यस्थितीत मराठी माध्यमिक विदयालयाचे मुख्याध्यापक हे नियंत्रण ठेवत आहेत. त्यांना मुख्याध्यापकांचे उर्दू विदयालयांचे तात्पुरत्या स्वरुपात अतिरिक्त कामकाज देणे आवश्यक आहे.

सबब मी अति. आयुक्त (१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मला प्रदान केलेल्या अधिकारान्वये माध्यमिक विभागाची०६ उर्दू माध्यमिक विदयालयांना सर्व प्रकारची शासन मान्यता व उर्दू माध्यमाचे मुख्याध्यापक नेमणूकीपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात सध्यास्थितीत ज्या मराठी माध्यमाच्या मुख्यध्यापकांचे उर्दू माध्यमिक विदयालयांवर नियत्रंण आहे त्याच मराठी माध्यमाच्या मुख्याध्यापकांना उर्दू विदयालयाचे मुख्याध्यापक पदाचे अतिरिक्त कामकाज देणेत येत आहे.

अतिरिक्त आयुक्त (१)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८

प्रत –

मुख्याध्यापक,
माध्यमिक विदयालय रुपीनगर, थेरगांव, खराळवाडी, लांडेवाडी, नेहरुनगर, फुगेवाडी

२/- उर्दु माध्यमिक विदयालयाचे कामकाज पुढील आदेश येईपर्यंत करणेत यावे. सदर कामकाजाबाबत कोणतीही तक्रार येऊ नये याची स्पष्ट नोंद घ्यावी.

सहाय्यक आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८